म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : वा.वा.
दा. क्र. २००७

# प्रसाद

IRBK-0102001
IRBK-0102001

कु. ला. सांबेल

भ. ग्रं. सं. ठाणें
विषय बाल-वाङ्मय
वा. नं. २८८

सं. ठाणें
विषय
वा.

# प्रसाद

IRBK-0102001
IRBK-0102001

इतक्यांत दार वाजलें. लक्ष्मीचें काळीज धडाडलें.

लक्ष्मीनें दार उघडलें. दारांत तिचा भाऊ. तो म्हणाला,

'चल लवकर, आई बोलावते!'

लक्ष्मी घाबरली. लटलटां कापूं लागली. भीत भीत गेली. तेथें होती आई. तिथें होत्या तिच्या बाई.

बाई म्हणाल्या,

'लक्ष्मी, मी शिकवायला आलें आहे. पुस्तकं आण!"

लक्ष्मी भ्याली. कांहीं बोलेना–कांहीं चालेना. लक्ष्मीला ाटलें. काय करूं–काय नको. मनांत घाबरली. रडायला लागली. बाई म्हणाल्या,

'बरं जा. देवीचा प्रसाद आण!'

लक्ष्मीनें मान वर केली. धांवत खोलींत गेली. साखरेची ुडी हातांत घेतली. बाईच्याजवळ आली. एक खडा बाईना दिला. दुसरा खडा आईला दिला.

'हें घे तुला!' बाईनीं तिच्या हातांत कसला तरी पुडा दिला.

लक्ष्मीनें पाहिलें. तो एक पुडा होता–पेढ्यांचा? छे. त्याहीपेक्षां मोठा. लक्ष्मीनें पुडा सोडला. बघते तों काय—

त्यांत तिचीं पुस्तकें!

बाई म्हणाल्या,

'मींच आणलीं तीं. मी तुझ्या मागोमाग होतें!'

लक्ष्मीला खूप आनंद झाला. तिनें बाईचा हात धरला.

आईचा हात धरला. त्यांना खोलींत नेलें. तसबिरीकडे
केलें. लक्ष्मी म्हणाली,

'आई, बाई, पहा किती छान माझी राणी!'

आई हसली–बाई हसल्या.

लक्ष्मी म्हणाली,

'बाई, आईला कहाणी सांगा!'

'काय सांगूं?'

लक्ष्मी म्हणाली,

'एक होती राणी–ती होती फार शहाणी!'

---

# प्रसाद

विश्वास व त्याचा चुलतभाऊ चंद्रकांत हे दोघे
ळीच्या सुटींत कोंकणांत आपल्या गांवीं गेले होते
शाळेच्या बालवीर पथकांत असल्यामुळें त्यांनीं पुष्कळ
केल्या होत्या. गांवीं गेल्यावर एके ठिकाणीं बसून राहाण
त्यांना दोनच दिवसांत कंटाळा आला. पण दिवाळी
भातकापणीचा हंगाम. जो तो आपल्या कामांत गर्क.
बरोबर बोलायला आणि फिरायला वेळ कोणाला होता.

त्यांच्या घरासमोर दूरवर असणाऱ्या डोंगरावर एक प्राचीन देवालय होतें. दारांत उभें राहून देवालयाचा कळस अस्पष्ट दिसत असे. देवालयांतील मूर्तीचें कोरींव काम पाहाण्यासारखें आहे, असें लोकांनीं म्हणतांना त्यांनीं ऐकलें होतें. तें देवालय पांडवांनीं बांधिलें अशी दंतकथा ऐकून तर देवालय पाहण्याची त्यांची उत्कंठा वाढली.

विश्वास व चंद्रकांत यांनीं देवालय पाहायला जायचें ठरविलें.

ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं ते पहाटेलाच उठले. स्नान आटोपून त्यांनीं बालवीराचे कपडे चढविले. दोन पिशव्यांत डाळ, तांदूळ, मीठमसाला वगैरे जिन्नस घेतले. ते बालवीर असल्यामुळें प्रवासांत स्वतः हातानें सैंपाक करण्याची त्यांना संवय होती. देवळांत जेवण करून जेवण्याचा त्यांचा विचार होता.

एका हातांत पिशवी व दुसऱ्या हातांत स्वतःच्या उंची इतका एक मजबूत बांबू घेऊन सकाळच्या गारगार मजेदार हवेंत ते वाट चालूं लागले.

दिशा उजळल्या. सूर्याचीं सोनेरी कोंवळीं किरणें सर्वत्र पसरलीं. सोनेरी शेतें जागीं झालीं व डोलूं लागलीं.

निसर्गाची शोभा पाहात व गप्पागोष्टी करीत, रेंगाळत चालतांना त्यांना एक प्रकारचा आनंद वाटत होता.

सूर्य आकाशांत वरवर येऊं लागला. ऊन कडक होन
लागलें. तसे ते झपाझप चालूं लागले. दहा वाजण्याच्
सुमारास ते देवालयांत पोंहचले. देवालयाची शोभा पाह
त्यांना उत्साह वाटला.

हातांतील सामान योग्य जागीं ठेवून पंधरा मिनि
त्यांनीं देवळाची पाहाणी केली. नंतर तीन दगड रच
चुलीची आराधना करण्यास त्यांनीं आरंभ केला. सैंपा
झाल्यावर तेथल्याच विहिरीवर थंड पाण्यानें त्यांनीं मनसो
आंघोळ केली.

त्यांनीं कोरडे कपडे अंगावर चढवले. इतक्यांत देवळ
समोरच्या दाट झाडीमधून आलेल्या वाटेनें एक धिप्प
माणूस येतांना त्यांना दिसला.

विश्वास चंद्रकांताच्या कानांत हळूच कांहींतरी पुटपुट
पिशवींतील कसलीशी पुडी ताटांत टाकून ताट हातांत घेऊ
चंद्रकांत देवळाच्या गाभाऱ्याकडे निघाला.

तो काळाकुट्ट धिप्पाड माणूस विश्वासजवळ आ
त्याच्या हातांत एक हातभर लांब सुरा चमकत होता.
ओरडला —

'कुठं चाललास रे पोरा?'

विश्वास चांचरत म्हणाला,

'देवाला प्रसाद दाखवायला चाललाय तो!'

'चल, लवकर ये रे पोरा. आम्हांला सुद्धां देवाचा प्रस
दे आणि तुमच्याजवळ असतील तितके पैसेही द्या.'

गाभाऱ्यांत घंटेचा आवाज झाला व चंद्रकांत पूर्ववत् हातांत घेऊन बाहेर आला. त्याला विश्वास म्हणाला,
'चंदू, यांना अगोदर देवाचा प्रसाद दे.'



चंद्रकांत त्या भयंकर माणसापुढें उभा राहिला. त्या माणसानें सुरा कमरेला खोवला. डाव्या हाताच्या तळव्यावर उजव्या हाताचा पंजा ठेवून तो म्हणाला,

'खूपसा प्रसाद दे रे पोरा.'

'घ्या ना!"

असें म्हणून पुडींतला पदार्थ चंद्रकांतानें झटकन् त्या माणसाच्या दोन्ही डोळ्यांत फेंकला. भयंकर भगभगीत मसाला होता तो!

इतक्यांत त्याला कोणीतरी हालविलें. माधवनें पांघरूण बाजूला करून पाहिलें तों विनायक त्याच्या बाजूला उभा होता. विनायक म्हणाला,

'झोपलास ?'

'नाहीं. तूं नाहीं झोपलास ?'

'मला झोप येत नाहीं.'

'आणि मलासुद्धां.'

'माधव, मी तुला चुकून अपशब्द बोललों. रागामुळें मला भान राहिलें नाहीं.' विनायक गहिंवरला. 'मी सुद्धां चुकून तुझा सदरा फाडला. आपण आपली चूक सुधारूंया. सगळें विसरून जाऊंया.'

'खरं ?' विनायकाचें हृदय आनंदानें भरलें.

धांवत जाऊन त्यानें अंथरुण आणिलें व नेहमीं प्रमाणें माधवच्या शेजारीं पसरलें.

त्या दोन मित्रांनीं एकमेकांचे हात हातांत घेतले. ते किती वेळ तरी बोलत होते. हातांत हात ठेवूनच ते केव्हां झोपी गेले हें त्यांचें त्यांनाच कळलें नाहीं !



# एकवीर

कोंकणांतील एका खेड्यांत एक शेतकरी राहत होता. त्याचें नांव दाजी. दाजीला रामू नांवाचा एक मुलगा होता.

रामू दाजीचा एकुलता एक मुलगा होता. त्यामुळें ामूवर त्याचें फार प्रेम होतें. रामू त्याला जीव कीं प्राण ाटे. त्याला टाकून दाजी दुसऱ्या गांवाला सुद्धां कधीं जात ासे. देवळांत, शेतावर जेथें दाजी जाई तेथें तो रामूला ाऊन जाई. रामूचें आपल्या बापावर तसेंच प्रेम होतें.

थोडा मोठा झाल्यावर रामू प्रत्येक कामांत बापाला ादत करण्याचा प्रयत्न करी. बापानें 'नको' म्हटलें र रामू म्हणे—'बाबा, मीं नाहीं मदत केली तुम्हांला र दुसरा कोण करणार?'

रामूचे शब्द ऐकून दाजीला धन्यता वाटे. तो त्याला जवळ घेऊन प्रेमानें मुका घेई.

दाजीचा एक बैल होता. त्याचें नांव कबीर. कबीराला राखण्याचें काम रामूलाच करावें लागे. तें काम तो आवडीनें करी. कबीर फार चांगला बैल होता. रामूच्या जन्माच्या अगोदरपासून तो त्यांच्या घरीं होता. कबीर इतका गरीब होता, कीं रामू त्याच्या पोटाखालून खुशाल जायचा. कबीर केव्हां केव्हां तर सरळ घरांत शिरायचा. त्यामुळें लहानपणापासून रामूची व त्याची चांगली ओळख झाली होती.

रामू थोडा मोठा झाला. तेव्हां दाजी त्याला कबीराच्या पाठीवर गमतीनें बसवायचा. मग तर रामूला ती संवयच झाली. तो रडत असला तर दाजी त्याला कबीराच्या पाठीवर बसवायचा. मग रामूचें रडें थांबायचें व हंसणें-खिदळणें सुरू व्हायचें!

कबीर रवंथ करीत बसलेला असला, कीं रामू त्याची पाठ व मान खाजवायचा. कबीराला रामूचा लळा लागूं लागला.

आतां तर काय! कबीराचें सर्वच रामू करतो. सकाळीं त्याचें शेण काढणें, त्याला चरायला नेणें, पाणी प्यायला नदीवर नेणें, संध्याकाळीं गोठ्यांत बांधून पुढ्यांत गवत टाकणें वगैरे कामें तोच करतो.

एक दिवस रामू बापाला म्हणाला, 'बाबा, कबीराच्या जोडीला दुसरा एक बैल घेतला पाहिजे. मग त्या दोघांचें जोत मी धरीन.'

दाजी म्हणाला,

'घेऊंया हं!'

दाजीनें असें म्हटलें खरें, पण कबीराच्या जोडीला दुसरा बैल त्याला कधींच घेतां आला नाहीं.

एकदां रामू तापानें फार आजारी पडला. दाजीच्या तोंडचें पाणी पळालें. गांवठी औषधांनीं रामू बरा होईना म्हणून त्याला जवळच्या पेठेंतील डॉक्टरकडे नेण्याचा सल्ला शेजाऱ्यांनीं दाजीला दिला. डॉक्टरकडे रामूला न्यायचें तर पैसे पाहिजेत. दाजीजवळ इतके पैसे नव्हते.

पैसे मिळविण्याची दाजीला एक युक्ति सुचली. तो आपल्या बायकोला म्हणाला,

'कबीराला विकूंया. जे पैसे येतील त्यांत रामूला औषधपाणी करतां येईल.'

दाजीचे हे शब्द रामूनें ऐकले. तो दाजीला जवळ बोलावून म्हणाला, 'बाबा, काय वाटेल तें झालें तरी कबीराला विकूं नका. कबीराला विकलेंत तर मी बरा होणार नाहीं.'

रामूचे शब्द ऐकून दाजी पेंचांत सांपडला. सावकाराकडून कर्ज घ्यावें तर अगोदर घेतलेलें कर्ज अजून फिटलें नव्हतें. शेवटीं दाजीचा नाइलाज झाला. तो सावकाराकडे गेला. दोन महिन्यांत पैसे परत केले नाहींत तर कबीर तुम्हांला विकून टाकीन, असें सावकाराला सांगून दाजीनें पंधरा रुपये आणिले.

डॉक्टरच्या औषधानें रामू बरा झाला. पहिल्याप्रमाणें कबीराला चरायला नेऊं लागला.

बोलीप्रमाणें दोन महिने झाले. सावकार दाराशीं आला. दाजीनें पुन्हां आणखी दोन महिन्यांची बोली केली.

अशा तऱ्हेनें सहा महिने गेले. या सहा महिन्यांत दाजीनें खूप खटपट केली पण सावकाराचे पंधरा रुपये त्याला फेडतां आले नाहींत.

एक दिवस सावकार दाजीकडे येऊन म्हणाला,

"दाजी, माझे पैसे दे नाहींतर बैल दे.'

दाजीनें सावकाराच्या अनेक प्रकारें विनवण्या केल्या, पण सावकार ऐकेना.


शेवटीं दाजीनें त्याला बैल देऊन टाकला.

कबीराचें दावें हातांत धरून सावकार त्याला ओढीत नेऊं लागला.

आपल्या कबीराला सावकार नेत आहे, ही गोष्ट रामूला कळली. तो धांवत धांवत खळ्यांत आला.

कबीर पुनः पुन्हा मागें वळून पहात होता. कबीराच्या डोळ्यांत पाणी चमकत असलेलें रामूला दिसलें.

रामूला रडूं कोसळलें. तो मटकन् खालीं बसला. 'कबीर! कबीर!' अशा कितीतरी हांका त्यानें मारल्या. पण बिचारा कबीर काय करणार?



विनायकाचे वडील फार गरीब होते. विनायक चौथी इयत्ता पास झाला तेव्हां त्यांनीं त्याला शाळा सोडण्यास सांगितलें. पण विनायकाच्या मनांत पुढें शिकायचें होतें. जवळ पैसा नाहीं, मग त्याचे वडील त्याला पुढें शिकविणार कसे ?

इच्छा असली तर मार्ग सांपडतोच अशी एक म्हण आहे. विनायकाला पुढें शिकण्याचा मार्ग सांपडला.

त्याच्या गांवांतील एक गृहस्थ मुंबईंत मोठे व्यापारी होते. त्यांचा तांब्यापितळेच्या भांड्यांचा मोठा कारखाना मुंबईस होता. ते गृहस्थ या वेळीं गांवीं आले होते. ते विद्येस उत्तेजन देणारे आहेत, असें विनायकाला कळलें होतें.

एक दिवस विनायक त्यांच्या घरीं गेला व त्यांना भेटला. बोलण्याचालण्यांतील त्याची नम्रता व सभ्यता पाहून ते गृहस्थ मनांत खूष झाले. विनायकाची पुढें शिकण्याची

इच्छा व स्वतः येऊन भेटण्यांत त्यानें दाखविलेला धीटपणा पाहून त्यांना त्याचें कौतुक वाटलें.

त्यांनीं त्याला आपल्याबरोबर मुंबईला नेऊन त्याच्या शिक्षणाची सोय करण्याचें ठरविलें. ते विनूला म्हणाले,

" विनू, मी तुला मुंबईला नेईन. तेथें तुझी शिकायची व्यवस्था करीन. पण घरांत सांगितलेलें काम तुला करावें लागेल."

विनायकानें त्यांचें म्हणणें मोठ्या आनंदानें कबूल केलें. कारण कितीही कष्ट सहन करावे लागले तरी ते सोसून शिक्षण घ्यावें असें त्याला वाटत होतें.

पुढें तो त्या गृहस्थांबरोबर मुंबईला गेला. त्यांनीं त्याला चांगले कपडे शिवले. पुस्तकें घेऊन दिलीं. विनायक शाळेंत जाऊं लागला. दुसऱ्याच्या उपकारामुळें आपण शिकत आहोंत हें तो कधीं विसरला नाहीं. आपला अभ्यास तो मन लावून करायचाच. पण त्या गृहस्थांची प्रत्येक आज्ञा अगदीं काळजी-पूर्वक आणि आपुलकीनें तो पाळीत होता.

त्या गृहस्थांना एक मुलगा होता. त्याचें नांव वसंत. वसंत विनायकापेक्षां दोन वर्षांनीं मोठा होता. श्रीमंतींत वाढल्यामुळें तो फार चैनी बनला होता. अभ्यासापेक्षां नाटक सिनेमा पाहणें त्याला फार आवडे. अशा रीतीनें आठवड्याला तो कितीतरी पैसा उडवी. विनायकालाही तो केव्हां केव्हां आपल्याबरोबर बोलावी पण विनायक शक्य तो त्याच्याबरोबर जाण्याचें टाळीत असे.

एकदां ते गृहस्थ घरांतील सर्व मंडळीसह माथेरानला गेले. वसंत व विनायक यांना त्यांनीं आपल्याबरोबर नेलें नाहीं—कारण त्यांची परीक्षा चालू होती. परीक्षा संपल्यावर दोन दिवसांनीं ते माथेरानला जावयाचे होते.

रात्रीं वसंत व विनायक एकत्र अभ्यास करीत बसले असतां मध्येंच वसंत उठला व तिजोरीच्या खोलींत गेला. थोड्या वेळानें तिजोरी उघडल्याचा आवाज विनायकाच्या कानीं पडला. तो चटकन् उठून त्या खोलीकडे वळला.

तिजोरींतील नोटा वसंत पाटलोणीच्या खिशांत कोंबीत असतांना दिसला. विनायकानें त्याला विचारलें,' वसंत, हें काय करतोस ? '

" तुला काय करावयाचं आहे ? मी वाटेल तें करीन."

' मी तुला तसं करूं देणार नाहीं.' विनायक म्हणाला.

" हें माझं घर ! हे माझे पैसे. तुला भिकारड्याला कोण विचारतो ? चल, हो बाजूला नाहींतर ढकलून देईन."

विनायक बाजूला झाला नाहीं. त्यानें वसंताला अडवून धरलें. वसंत जरा हळू आवाजांत म्हणाला,

" विनू, मोठ्यानं बोलूं नकोस. गडी उठेल. येतोस तर चल तूंही. आपण नाटकाला जाऊं." विनायक म्हणाला,

' वसंत, मी तुमच्या घरीं फुकट खातों. फुकट शिकतों. मी असा अप्रामाणिकपणानं वागलों तर मला कोणी जवळ उभंही करणार नाहीं.'

वसंतानें विनायकाला जोरानें ढकलून दिलें.

विनायकाचें डोकें दारावर जोरानें आपटल्यामुळें मोठी खोक पडली. डोकींतून भळभळ रक्त वाहूं लागलें.

इतक्या वेळांत गडी जागा झाला होता. त्यानें डॉक्टरला बोलावून आणलें. डॉक्टरांच्या उपचारांनीं दोन तासांनीं विनायक शुद्धीवर आला.

दुसऱ्या दिवशीं त्या गृहस्थांना ही हकिकत माथेरानला कळली. ते तसेच मुंबईला आले. आपल्या मुलाचें दुष्कृत्य पाहून त्यांच्या हृदयाला जखम झाली.

पुढें त्यांनीं विनायकाला उच्च शिक्षणासाठीं परदेशीं पाठविलें. विनायकानें तिकडील साखरेच्या कारखान्याचें चांगलें ज्ञान संपादन केलें. स्वदेशीं आल्यावर मोठमोठ्या मंडळींच्या साह्यानें त्यानें एक साखरेचा कारखाना सुरू केला.

विनायकाचे उपकारकर्ते गृहस्थ याच सुमारास मरण पावले. वसंत अफाट संपत्तीचा एकटाच मालक झाला. तोंडपुज्या मित्रांच्या जाळ्यांत सांपडून लवकरच तो भुके-कंगाल झाला!

विनायकाला वसंताची ही स्थिति कळतांच त्यानें मुद्दाम त्याला आपल्याकडे बोलावून घेतलें व त्याची आपल्या कारखान्यांत उत्तम सोय लावून दिली.

आतां नेहमीं बोलतं देवमाणूस म्हणून उल्लेख करतो.

IRBK-0102001
IRBK-0102001